मंडळाच्या निवडणूकीमध्ये मतदान करणेसाठी प्रतिनिधी म्हणून भागीदार, संचालक किंवा पदाधिकारी यांची नेमणूक करता येईल.

३) जो क्रियाशिल सभासदास कायद्याच्या कलम ७३ सीए (१)(i) नुसार थकबाकीदार असेल तर त्यास मतदानाचा हक्क बजावता येणार नाही.

१८) **संयुक्त सभासदत्व : अधिकार व जबाबदाऱ्या :**

१) बँकेच्या भाग एकापेक्षा जास्त व्यक्तींच्या नांवे संयुक्तरित्या घेता येतील.

२) संयुक्त भागधारकाचे बाबतीत कोणाच्याही मृत्यूनंतर हयात असलेल्या व्यक्ती संयुक्त/व्यक्तीगत भागधारक म्हणून गणल्या जातील.

३) संयुक्त भागधारक संबधीत भागांबाबतच्या देण्यास संयुक्तपणे/विभक्तरित्या जबाबदार राहतील.

४) संयुक्त भागधारकाचे बाबतीत भाग दाखल्यावर ज्याचे प्रथम नांव लिहिले असेल त्याला सभासदांचे सर्व हक्क प्राप्त होतील व तो वार्षिक सर्वसाधारण सभेची नोटीस मिळण्यास व जाहीर केल्यानुसार लाभांश मिळण्यास पात्र राहील.

५) ज्यावेळेस क्रियाशिल सभासद बँकेचे भाग एकापेक्षा जास्त व्यक्तींबरोबर संयुक्तरित्या धारण करत असेल त्यावेळेस ज्या व्यक्तीचे नांव प्रथम असेल त्या व्यक्तीस, मतदानाचे अधिकार प्राप्त होतील. पण त्या व्यक्तीच्या गैरहजेरीत ज्या व्यक्तीचे नांव दुसऱ्या नंबरवर असेल त्या व्यक्तीस मतदानाचे अधिकार असतील पहिल्या दोघांच्या अनुपस्थितीत हाच नियम प्रत्येक पुढील नांवे असलेल्या व्यक्तीस लागू ोईल. मात्र अशी व्यक्ती अज्ञान असता कामा नये.

१९) **नाममात्र सभासद :**

१) एखादी व्यक्ती अविभक्त कुटूंबाची सहभागीदार असेल, अथवा कर्जदार सभासदाची जामीनदार म्हणून राहणार असेल अथवा एखाद्या व्यक्तीस तात्पुरती गरज भागविण्यासाठी रिझर्व्ह बँकेच्या मार्गदर्शक सुचनेस अनुसरुन कर्ज घ्यावयाचे असेल त्यास विहित नमुन्यात अर्ज व विनापरतीची प्रवेश फी रु.१००/- भरल्यानंतर नाममात्र सभासद होता येईल. परंतू कर्जदार व जामीनदार म्हणून असलेली सर्व देणी परत केल्यानंतर आपोआप त्याचे नाममात्र सभासदत्व संपुष्टात येईल या अटीवर आणि जो बँकेच्या कार्यक्षेत्रामध्ये कार्यरत आहे व कायद्याने सज्ञान व करार करणेस पात्र असणाऱ्या व्यक्तीस नाममात्र सभासद करुन घेता येईल.

२) बँकेच्या कर्मचाऱ्यांनाही नाममात्र सभासद होता येईल व त्याला नाममात्र सभासदांप्रमाणे फायदे मिळतील.

३) नाममात्र सभासद पुढील बाबींना पात्र असणार नाही.

अ) भाग दाखला मिळणे.

ब) लेखापरिक्षण झालेली आर्थिक पत्रके व वार्षिक अहवाल मिळणे.